ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5134, Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख ७ डिसेंबर, १९५५ | अंक ४५

## विविध माहिती

**स्टेट बँकेच्या नव्या शाखा**—भारतीय सरकारच्या संमतीनें आणखी १०० गांवांतून स्टेट बँकेच्या शाखा काढण्यांत येणार आहेत. ह्या नव्या गांवांची यादी बँकेनें तयार केली आहे. रूरल क्रेडिट सर्व्हेमध्यें ह्या बाबतींत ज्या सूचना केलेल्या आहेत त्या लक्षांत घेऊन गांवांची निवड करण्यांत आली आहे. ज्या भागांत बँकांची सोय नाहीं, अशा भागांना प्राधान्य देण्यांत आलें आहे.

**रशिआचा नवा हैड्रोजन बॉंब**—रशिआनें स्फोट केलेला नवा हैड्रोजन बॉंब बिकिनी बेटांत अमेरिकेनें केलेल्या बॉंबच्या तोलाचा असावा, असा अंदाज अमेरिकन शास्त्रज्ञांनीं केला आहे. १९५४ सालीं अमेरिकेनें स्फोट केलेल्या ह्या बॉंबची स्फोटक शक्ति १४ मेगॅटन इतकी होती. एक मेगॅटन म्हणजे १० लाख टन टीएन्‌टी अथवा स्फोटक द्रव्य, असा हिशोब आहे.

**काश्मीरमधील विजेचें उत्पादन**—काश्मीरच्या नियोजन समितीनें राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा खर्डा तयार केला आहे. पुढील पांच वर्षांत काश्मीरमधील विजेचें उत्पादन दुपटीनें वाढविण्याचें सरकारनें ठरविलें आहे. १९५६ सालांत राज्यांत १२,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. १९६१ अखेर २४,००० किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येईल.

**जर्मनींतील औद्योगिक प्रदर्शन**—पूर्व जर्मनींत लिपझिग ह्या ठिकाणीं ता. १६ फेब्रुवारी ते ८ मार्च, १९५६ पर्यंत एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत भाग घेण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. भारताप्रमाणेंच आणखी ४० देश प्रदर्शनांत आपला माल मांडणार आहेत.

**क्षयरोगावर नवें औषध**—क्षयरोगावर परिणामकारी ठरणारें नवीन औषध ऑस्ट्रेलिअन शास्त्रज्ञांनीं शोधून काढलें आहे. सध्यां त्याचा प्रयोग प्राण्यांवर करण्यांत येत असून त्यांच्या बाबतींत तरी तें १०० टक्के यशस्वी झालें आहे. पुढील वर्षी त्याचा प्रयोग क्षयरोग्यांवर करण्यांत येईल. औषध यशस्वी ठरल्यास तें गोळ्यांच्या रूपांत तयार करण्यांत येईल.

**समाजशास्त्रविषयक संशोधन-केंद्र**—संयुक्त-राष्ट्र-संटनेच्या शास्त्र व संस्कृतिविषयक उपसंघटनेनें समाजशास्त्रविषयक संशोधन करणारें आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें असून त्यासाठी कलकत्ता शहराची निवड केली आहे. औद्योगीकरण व सामाजिक सोयी ह्या विषयासंबंधीं आणि आधुनिक उत्पादनतंत्र व समाजजीवन ह्या विषयासंबंधीं केंद्रातर्फे संशोधन करण्यांत येणार आहे.

**पत्रकारांच्या नातलगांना साह्य**—आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रकार संघटनेच्या कार्यकारी समितीची बैठक बल्गेरिआची राजधानी सोफिआ येथें भरली होती. बांडुंग परिषदेला जात असलेल्या ‘ काश्मीर प्रिन्सेस ’ ह्या विमानाला जो अपघात झाला, त्यांत मरण पावलेल्या पत्रकारांच्या नातेवाइकांना १,००० डॉलर्सची रक्कम देण्यांत यावी असा ठराव समितीनें केला आहे.

**तिसरें महायुद्ध झालें तर**—जपानच्या पार्लमेंटचें एक प्रतिनिधिमंडळ चीनचा दौरा करून परत आलें. ह्या मंडळाला दिलेल्या मुलाखतींत चीनचे पुढारी माओ–त्से–टुंग म्हणाले कीं, तिसरें महायुद्ध सहसा होणार नाहीं; पण तें झालेंच तर जगाचा ८० टक्के भाग कम्युनिस्टांच्या ताब्यांत येईल.

**सीलोनची चहाची निर्यात**—सीलोनमधील चहाच्या निर्यातीची मक्तेदारी बहुशः परकीय कंपन्यांच्या हातीं आहे. ही परिस्थिति नाहींशी करण्यासाठी सीलोनमधील चहाच्या उत्पादकांनीं कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या संघटनेंत सध्यां चहाच्या उत्पादकांपैकी २५ टक्के उत्पादक सामील झाले आहेत.

**चीनच्या प्रगतीची प्रशंसा**—भारतीय लोकसभेचे एक सभासद, श्री. वेलापुधन चीनचा दौरा करून परत आले आहेत. चीनच्या प्रगतीविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, अगदीं थोड्या काळांत त्या देशांत कौतुक वाटण्यासारखी प्रगति सर्वच क्षेत्रांत करण्यांत आली आहे. चीनच्या योजनाबद्ध विकासाची तुलना करतां भारताचे पंचवार्षिक कार्यक्रम ठिगळांसारखे वाटतात, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें.

**चीनमध्यें संततिनियमनाचा प्रचार**—चीनच्या सरकारनें आपल्या सर्व अधिकृत वृत्तपत्रांतून व मासिकांतून संततिनियमनाचा प्रचार चालू केला आहे. संततिनियमनाचीं कृत्रिम साधनें कशीं वापरावीं ह्यासंबंधीं तपशीलवार सूचनाच सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यांत येत असतात.

**बेकारींत वाढ**—भारतांत गेल्या चार वर्षांत ४० लाख नव्या नोकऱ्या निर्माण करण्यांत आल्या. पण त्याच काळांत ७० लाख नवे उमेदवार नोकऱ्यांच्या बाजारांत उतरले.

**खनिज तेलाचा शोध**—भारतीय सरकारनें खनिज तेलाच्या शोधासाठी रशिअन तंत्रज्ञांची मदत घेण्याचें ठरविलें आहे. राजस्थानमधील जेसलमीरच्या आसपासचा भाग व आसाम व हिमालय पर्वत ह्यांच्यामधील पठार ह्या दोन भूभागांत तेल सांपडण्याचा संभव असल्यानें, इतर कोठल्याहि भागापेक्षा ह्या प्रदेशांत अधिक कसोशीनें शोध करण्यांत येणार आहे.

### कॅनडांतील रासायनिक कारखाने

कॅनडामधील रासायनिक कारखाने सध्यां अतिशय जोरांत चालू आहेत. त्यांच्या मालाच्या विक्रीनें नवा उच्चांक गाठला आहे. १९५४ सालांत झालेल्या विक्रीपेक्षा चालू सालाची विक्री २० टक्के अधिक होईल, असा अंदाज आहे. सुमारें १ अब्ज डॉलर्स किंमतीचा माल ते विकतील. सर्वच रासायनिक कारखान्यांच्या मालाला तेजी आली आहे.

### कॅनडा अधिक मदत देणार !

कॅनडाचे पंतप्रधान मि. पिअर्सन हे कोलंबो योजनेप्रमाणें देण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतींत वाढ करण्यांत यावी, अशी सूचना कॅनडाच्या पार्लमेंटला करणार आहेत. भारतांत काढण्यांत येणाऱ्या अणुसंशोधनकेंद्रासाठी आणि पाकिस्तानांत बांधण्यांत येणाऱ्या प्रचंड पाटबंधाऱ्यांच्या योजनेसाठी अधिक मदत लागेल असा त्यांचा अंदाज आहे.

### भारतामधील ॲटॉमिक रीॲक्टर

कॅनडाच्या मदतीनें भारतांत उभारण्यांत यावयाच्या ॲटॉमिक रीॲक्टरचें काम पुढील वर्षाच्या प्रारंभीं सुरू होईल, अशी माहिती भारताच्या अणुशक्ती-कमिशनचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं जाहीर केली आहे. भारतांत उभारण्यांत येणारा हा दुसरा रीॲक्टर आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें अणुशक्तीच्या संशोधनास अमोल मदत होते. मुंबई जवळील ट्रॉम्बे बेटांत त्याची उभारणी करण्यांत येणार असून १९५७ सालीं तो प्रत्यक्ष उपयोगांत आणला जाईल.

### लोखंडाच्या खाणीसाठी मदत

सिंगापूर येथें झालेल्या कोलंबो योजना-परिषदेला जपानी सरकारचे आंतरराष्ट्रीय व्यापार व उद्योग ह्या खात्याचे मंत्री गेले होते. भारताच्या पूर्वकिनाऱ्यावरील लोखंडाच्या खाणींचा विकास करण्यासाठी जपानची मदत मागण्यांत आली आहे, असें त्यांनीं जपानी मंत्रिमंडळाच्या बैठकींत सांगितलें. ते म्हणाले कीं, परिषदेंत भारततर्फे अशी विनंति करण्यांत आली कीं, रूरकेला येथील खाणींत जपाननें ८० लाख डॉलर्स गुंतवावे आणि तितक्या किंमतीचें लोखंड भारतांतून न्यावें.

### सामुदायिक शेतीचा प्रयोग

अहमदाबाद जिल्ह्यांतील एका खेड्यांत दहा-बारा उत्साही तरुणांनीं सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरू केला आहे. ह्या खेड्यांतील इतर शेतकऱ्यांनींहि आपल्या खेड्याचा विकास साधण्याच्या कामीं सहकार्य देण्याचें ठरविलें आहे. कोणाच्या मदतीची अपेक्षा न ठेवतां त्यांनीं कार्य चालू केलें आहे. खेड्याला येण्यासाठी लागणारा रस्ता श्रमदानानें करण्यांत येणार आहे. एरव्हीं ह्या कामासाठी ५,००० रुपये लागले असते. त्याशिवाय एक वाचनालय आणि विहीर ह्यांचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे.

### आतां अधिक कर नकोत

मुंबई सरकारनें बडोदा म्युनिसिपालिटीला मालमत्तेवरील कराचें प्रमाण ८ टक्क्यांवरून १० टक्क्यांवर नेण्यांत यावें असें सुचविलें होतें. असें न केल्यास सरकारची मदत बंद करण्यांत येईल, असा इशाराहि देण्यांत आला होता. परंतु, बडोदा म्युनिसिपालिटीच्या सभासदांच्या मतानें शहरांतील लोकांना आतां अधिक कर देतां येणें अशक्य आहे. बडोदा शहरांतील मालमत्तेवर अधिक कर बसविण्यांत येऊं नयेत, अशी विनंति मुंबई सरकारला करण्याचें म्युनिसिपल कौन्सिलनें ठरविलें आहे.


### बँका आणि त्यांच्या जाहिराती

जनतेचा संपूर्ण विश्वास बँकिंगला अत्यावश्यक आहे. आपले नेहमींचे गिऱ्हाईक किंवा संभाव्य गिऱ्हाईक ह्यांनाच फक्त बँकांनीं आपल्या सेवेचा संदेश पोंचविण्यानें पुरणार नाहीं; त्यांच्या प्रसिद्धीचा पाया अधिक विस्तृत हवा. बँकांचें समाजाच्या दृष्टीनें किती महत्त्व आहे व आधुनिक व्यापारी व्यवहारांत बँकिंगचें स्थान किती अगत्याचें आहे, हें प्रत्येक नागरिकाला पटवून देण्यांत आलें पाहिजे. ह्यासाठी बँकांनीं सतत जाहिरात केली पाहिजे.


### " पैसे गुंतविण्यासाठी "

[ सुरक्षित व जास्तींत जास्त व्याज सुटेल या दृष्टीनें मधून मधून " अर्था " तून निवडक शेअर्ससंबंधींची माहिती देण्याचें योजलें आहे. शेअर्सची निवड फार काळजीपूर्वक व अनेक वर्षे अनुभव असलेल्या ब्रोकर्सकडून करून घेण्यांत येत आहे. " अर्था " च्या वाचकांना याचा उपयोग होईल असा विश्वास वाटतो. ]

**पेरिया करमलाई टी अँड प्रोड्यूस कं.**

**स्थापन इ. स. १९१३.**

**मॅनेजिंग एजंटस—मे. पीअर्स लेस्ली अँड कं.**

ऑफिस—कोझीकोडे, मलबार.

दक्षिणेकडील चहाच्या कंपन्यांत सर्वोत्कृष्ट इतिहास असलेली कंपनी. नैसर्गिक अनुकूलता व चोख व्यवस्था यामुळें हे शेअर्स धारण करणाऱ्यांचें आतांपर्यंत भांडवल परत येऊन घरांत शेअर्स फुकट पडलेले आहेत. कंपनीनें आतांपर्यंत अनेक वेळां बोनस शेअर्स दिलेले आहेत आणि चालू ताळेबंद व कमाई पाहतां पुढील दोन वर्षांत निश्चित पुन्हां बोनस शेअर्स येतील, असें वाटतें.

कंपनीचे मळे अनमलाई डोंगरांत साधारणतः समुद्रसपाटीपासून ४,०००′-४,५००′ उंचीवर असून त्यांना दोन्ही पावसांचा लाभ होतो. कंपनीच्या मालकीची जमीन पांच हजार एकरांवर असून लागवडींत आणलेल्या दर एकरीं भांडवली खर्च फारच कमी, म्हणजे रु. ९२२ आहे.

१९५५-५६ सालीं चहाच्या उत्पादनाची अपेक्षा साडे-एकूणचाळीस लक्ष रत्तलावर आहे व कॉफी तीस टन म्हणजे मागील वर्षाइतकीच आहे व आजपर्यंतचें उत्पादन अपेक्षेला धरून आलेलें आहे; म्हणजे डिव्हिडंड कायम राहीलच राहील.

कंपनीचें भांडवल सध्यां पस्तीस लाखाजवळ असून गंगाजळी तितकीच आहे, व त्यांतील पंचवीस लक्ष रोकड आहेत. मागील दहा वर्षे कंपनीनें तीस ते पंचेचाळीस टक्के डिव्हिडंड वाटलेलें आहे. ( मूळच्या रु. २।- किंमतीवर ). आज भाव रु. ९॥ च्या आसपास असून चालू भावावर दहा टक्के करमाफ व्याज पडूं शकतें. हे शेअर्स केव्हांहि विनत्रासानें घेतां-विकतां येतात.

—व. वि. लोणकर, एम. ए. बी. कॉम.
१२८६ अ, पुणें, ५.

# अर्थ

बुधवार, ता. ७ डिसेंबर, १९५५



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

## नव्या सहकारी कारखान्यांच्या जागेची निवड

दि डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनची १६ वी वार्षिक साधारण सभा नुकतीच भरली, त्यावेळीं श्री. के. जे. सोमय्या ह्यांनीं अध्यक्षपदावरून केलेल्या आपल्या भाषणांत कित्येक महत्त्वाचे मुद्दे मांडले. १९५४–५५ मध्यें हिंदी साखरकारखान्यांनीं १५·८६ लक्ष टन साखरेचें उत्पादन केलें; १९५१–५२ मधील उच्चांकापेक्षा हा आकडा ८७,००० टनांनीं मोठा आहे; मुंबई राज्यांतील साखरकारखान्यांनीं १·७३ लक्ष टन साखर तयार करून उत्पादनाचा नवा उच्चांक गाठला; अशी माहिती देऊन त्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

महाराष्ट्रांत नवे सहकारी कारखाने स्थापन होत आहेत, त्याविषयीं श्री. सोमय्यांचें म्हणणें उद्बोधक होईल. उत्पादन-वाढीस नवे कारखाने हातभार लावतील, ह्याबद्दल त्यांनीं नव्या कारखान्यांचें स्वागत केलें. परंतु, कारखान्यांना व्हावयाच्या उसाच्या पुरवठ्याबाबत त्यांनीं थोडीशी तक्रार केली. नव्या कारखान्यांसाठी जागा निवडतांना, त्यामुळें जुन्या कारखान्यांच्या ऊसपुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम होतां कामा नये आणि सध्यांचे कारखाने सध्यां ज्या क्षेत्रांतून त्यांना लागणारा जादा ऊंस खरेदी करतात, तें क्षेत्र वगळून बाकीच्या क्षेत्रांतील उसाचा पुरवठा नव्या कारखान्यांना पुरेसा व्हावा. सध्यांच्या कारखान्यांपैकी कित्येकांनीं आपली यंत्रसामुग्री वाढवून उत्पादनक्षमता सुधारली आहे, त्यामुळें त्यांची उसाची मागणी वाढली आहे. कारखान्यांना व्हावयाचा पाण्याचा पुरवठा मर्यादित आहे, त्यामुळें त्यांच्या उसाच्या क्षेत्रासहि तो अपुरा पडतो आणि त्यांना खासगी ऊंसकऱ्यांकडून ऊंस विकत घ्यावा लागतो. ज्या आजूबाजूच्या खेड्यांतून हा ऊंस येतो, त्यांवर नव्या कारखान्यांनीं उससाठी हक्क सांगूं नये, अशी श्री. सोमय्या ह्यांची मागणी आहे. सध्यांचा चालूं कारखाना व नवीन स्थापावयाचा कारखाना ह्यांचेमध्यें किमान २० मैलांचें तरी अंतर असावें, म्हणजे प्रत्येकाला १० मैलांच्या त्रिज्येंतील ऊंस मिळूं शकेल, अशी त्यांची सूचना आहे. ही अगदीं प्राथमिक खबरदारी घेण्यांत आली नाहीं आणि नवे कारखाने सध्यांच्या कारखान्यांच्या भोंवतालचा ऊंस घेऊं लागले, तर जुन्या कारखान्यांना आवश्यक तो ऊंस विकत मिळूं शकणार नाहीं व त्यांची संपूर्ण उत्पादन-क्षमता वापरली जाणें अशक्य होऊन बसेल. त्या कारणानें त्यांचें उत्पादन घटेल, उत्पादनखर्च वाढेल आणि उत्पादनवाढीचा उद्देश साध्य होणार नाहीं.

पूर्वी ६०० टनांचा कारखाना आर्थिक दृष्ट्या परवडत असे; आतां १,००० टनाखालचा कारखाना सुद्धां त्या कसोटीस येत नाहीं. पश्चिम संयुक्त प्रदेशांतील कांहीं कारखान्यांनीं उत्पादन-क्षमता ३,००० टनांपर्यंत वाढविली आहे आणि कांहींनीं तर ४,००० टनांची यंत्रसामुग्री उभारण्याचा चंग बांधला आहे. मुंबई राज्यांतील बहुतेक कारखाने १,००० टनाखालचेच आहेत, कांहीं १,००० टनांचे आहेत आणि फक्त एकाचीच क्षमता १,३०० टनांची आहे. तेव्हां, १,००० टनांच्या क्षमतेपेक्षा लहान असे नवे कारखाने मुंबई राज्यांत उभारण्याऐवजीं चालू कारखान्यांची वाढ होण्यास मोकळीक मिळाली पाहिजे, असें श्री. सोमय्यांनीं सांगितलें. नाहीं तर, मुंबई राज्यांतील कोणत्याच कारखान्याचा इतर राज्यांतील मोठ्या कारखान्यांपुढें टिकाव लागणें अवघड जाईल. चालू कारखाने वाढविण्यास भांडवलहि कमी पुरेल. नव्या कारखान्यांना लायसेन्स देतांना ह्या सूचनेचा मुंबई व मध्यवर्ती सरकारनें विचार करावा, अशी श्री. सोमय्यांची सूचना आहे.

## तागाच्या गिरण्यांचें आधुनिकीकरण

भारतामधील तागाच्या गिरण्यांचें आधुनिकीकरण करण्यांत येत आहे. तागाच्या धंद्याशीं आतां युरोपांतील व आशिआंतीलहि कांहीं देशांकडून स्पर्धा करण्यांत येत आहे. ह्या स्पर्धेला तोंड देण्यासाठीच आधुनिक यंत्रसामुग्री बसविण्याचा कार्यक्रम आखण्यांत आला आहे. एकूण ८५ गिरण्यांपैकीं ४४ गिरण्यांनीं नवी यंत्रसामुग्री बसविली आहे, अगर बसविण्याचें काम चालू केलें आहे. इतर गिरण्याहि ह्या बाबतींत समाधानकारक प्रगति करीत आहेत. तागाच्या गिरण्यांना लागणारी नवी यंत्रसामुग्री परदेशांतून आयात करण्यांत येत आहे. सर्व गिरण्यांना मिळून सुमारें ८ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामुग्री आयात करावी लागेल. आयातीसाठी जरूर असणारे परवाने १९५४ च्या जानेवारीपासून भारतीय सरकार देऊं लागलें. ह्या कार्यक्रमासाठी गिरण्यांना आर्थिक मदत करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ही मदत नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या संस्थेमार्फत देण्यांत येणार आहे. गिरण्यांकडून कर्जें मिळविण्यासाठी जे अर्ज येतील, त्यांचा विचार करण्यासाठी कॉर्पोरेशननें एक खास कमिटी नेमली आहे. एकंदरींने विचार करतां, तागाच्या धंद्याची परिस्थिति समाधानकारक आहे. तागाच्या मालाची निर्यात तर वाढत आहेच; पण देशांतील मागणीहि बरीच वाढेल असा अंदाज आहे. देशांतील वाढतें औद्योगिक व शेतीचें उत्पादन ह्यांच्यामुळें तागाच्या मालाची जरूरी वाढतच जाणार आहे. गेल्या कांहीं महिन्यांत गिरण्यांजवळील सांठा कमी होत चालला आहे. १९५५ च्या सप्टेंबर अखेर गिरण्यांजवळ ६९,७०० टन इतका सांठा होता. इतकें उत्पादन करण्यास गिरण्यांना अवघा एक महिना सुद्धां लागणार नाहीं. ह्यावरून तागाच्या गिरण्यांना भावी काळ अनुकूल आहे हें उघड आहे.

## पेकिंगजवळ ग्रहगोल

पेकिंगच्या पश्चिमेस कांहीं अंतरावर आकाशस्थ ग्रहांच्या भ्रमणाची कल्पना आणून देणारा ग्रहगोल बांधण्यांत येत आहे. ह्या गोलाच्या घुमटाचा व्यास २३ मीटर असेल आणि दोन्ही बाजूला प्रेक्षकांना बसण्यासाठी दोन सज्जे बांधण्यांत येतील. नॅंकिंग वेधशाळेंतील प्रमुख खगोलशास्त्रज्ञ येथें काम करतील.

## बिलमार्केट योजनेचीं साडे-तीन वर्षे

बिलमार्केट योजना भारतांत आतां सुमारें ३½ वर्षे अंमलांत आहे. ह्या योजनेची प्रगति उत्तेजनकारक असून, ह्या योजने-खालील कर्जाचें प्रमाण सालोसाल वाढत आहे.

रिझर्व्ह बँक स्थापन होण्यापूर्वी, इंपीरिअल बँक सरकारच्या करन्सी खात्याकडून हंगामामध्यें हुंड्यांचे आधारावर कर्जे घेत असे. रिझर्व्ह बँकेनें बिलमार्केट योजना सुरू केली, तेव्हां ती १० कोटी रु. पेंक्षा अधिक ठेवी असणारांसाठी लागू केली. त्या बँकांनीं ९० दिवस मुदतीच्या हुंड्या रिझर्व्ह बँकेस लावून घाव्या व त्या तारणावर कर्ज द्यावें अशी योजना होती. हुंड्यांच्या खरेपणाबद्दल रिझर्व्ह बँक खात्री करून घेत असे. हुंड्या रीडिस्कौंट केल्या जात नव्हत्या; त्यांचे तारणावर कर्ज मिळे. त्यामुळें, परत-फेड सोपी होती. व्याजाचा दर बँकरेटच्या खाली ½%, म्हणजे ३% असे, तोच अद्याप कायम आहे.

जून, १९५२ पासून ५ कोटी रु. ठेवींच्या बँकांनाहि ह्या योजनेचा फायदा मिळूं लागला; बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या २२ व्या कलमाखाली त्यांना लायसेन्स मिळालेला मात्र असला पाहिजे. जुलै, १९५४ मध्यें किमान ठेवींची अट रिझर्व्ह बँकेनें काढून टाकली, प्रत्येक वेळीं घ्यावयाच्या कर्जाची किमान रकम १० लक्ष रुपयांवर उतरविली व प्रत्येक हुंडीची किमान रकम ५० हजार रुपयांवर आणली.

रिझर्व्ह बँकेनें दिलेलीं कर्जें

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १ | एकूणशीं प्रमाण % | २ | एकूणशीं प्रमाण % | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९५१ | ७७ | — | — | — | ७७ |
| १९५२ | १६४ | ६६·८ | ८२ | ३३·२ | २४६ |
| १९५३ | १३० | ६६·३ | ६६ | ३३·७ | १९६ |
| १९५४ | १८० | ५६·२ | १४७ | ४३·८ | ३२६ |
| १९५५ (पहिली सहामाही) | ९१ | ४०·२ | १३५ | ५९·८ | २२६ |
| १९५४ (पहिली सहामाही) | ११६ | ४८·७ | १२२ | ५१·३ | २३८ |

१:–१७ (४) अ कलमाखाली सरकारी रोख्यांच्या तारणावर.
२:–१७ (४) (क) कलमाखाली बिल मार्केट स्कीमप्रमाणें.

### रशिआंतील अणु-बॉम्बचे स्फोट

सोव्हिएट रशिआमध्यें गेल्या १३ महिन्यांत १२ अणुस्फोट झाले असून त्यासंबंधीची माहिती अमेरिकन सरकारनें लोकां-पासून गुप्त ठेवली, अशी माहिती डॉ. राल्फ लॅप ह्या अमेरिकन अणुशास्त्रज्ञानें जाहीर केली आहे. डॉ. राल्फ ह्यांच्या मतानें रशिअन शास्त्रज्ञ अणुबॉम्बच्यों निर्मितीच्या बाबतींत झपाट्यानें अमेरिकेच्या बरोबरीला येत असल्याचा हा पुरावाच आहे. रशिआच्या अणुस्फोटांविषयींची माहिती अमेरिकन लोकांना कळविली असती, तर ते घाबरले असते, त्यांनीं समतोल अंदाज-पत्रकाला विरोध केला असता अगर ते संपूर्ण शांततावादी होऊं लागले असते, अशीं कारणें त्यांनीं गुप्तता राखण्याविषयीं दिलीं आहेत.

शेड्यूल्ड बँकांचीं एकूण कर्जे व त्यांत हुंडी डिस्कौंटचें प्रमाण

( लक्ष रुपये )

| अखेर १ | एकूण कर्जें २ | हुंडी डिस्कौंट ३ | ३ चें २ शीं प्रमाण % ४ |
|---|---|---|---|
| १९५० | | | |
| मार्च | ४९८,४० | १२,२३ | २·५ |
| सप्टेंबर | ४३८,३२ | ८,७७ | २·० |
| १९५१ | | | |
| मार्च | ५८४,५६ | १२,५४ | २·२ |
| सप्टेंबर | ५३०,८१ | ७,८८ | १·५ |
| १९५२ | | | |
| मार्च | ६३२,२४ | ३०,८० | ४·९ |
| सप्टेंबर | ५२३,२९ | ५,४९ | १·१ |
| १९५३ | | | |
| मार्च | ५७६,३८ | ३०,३ | ५·३ |
| सप्टेंबर | ५०१,३३ | १९,८१ | ४·० |
| १९५४ | | | |
| मार्च | ५७२,१६ | ४१,०३ | ७·२ |
| सप्टेंबर | ५४६,१६ | २३,३३ | ४·३ |
| १९५५ | | | |
| मार्च | ६४१,८९ | ४८,३७ | ७·५ |

### दुधाच्या भुकटीचा कारखाना

मध्य सौराष्ट्रांतील वंकानेर ह्या भागांत दुधाची भुकटी तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. आशिआंत अशा प्रकारचा हा दुसरा मोठा कारखाना होईल. कारखान्यांत तयार झालेली दुधाची भुकटी १९५७ च्या मार्च मध्यें बाजारांत येईल, असा अंदाज आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या संबंधित शाखेनें कारखान्यासंबंधीं प्राथमिक पहाणी पूर्ण केली आहे. कारखान्यासाठी १० लाख रुपये भांडवल लागेल आणि त्यांत दरवर्षी १० लाख टन भुकटी तयार होईल. अशा प्रकारचा पहिला मोठा कारखाना आनंद येथें नुकताच चालू करण्यांत आला. नवीन कारखान्याची यंत्रसामुग्री येत्या कांहीं महिन्यांतच भारतांत येईल.

### अमेरिकेंतहि गरीब आहेत

अमेरिकन काँग्रेसची एक उपसमिति देशांतील दारिद्र्यासंबंधीं साक्षीपुरावा घेणार आहे. ह्या उपसमितीच्या मार्गदर्शनासाठी एक अधिकृत अहवाल तयार करण्यांत आला आहे. अहवालांत अशी माहिती देण्यांत आली आहे कीं, अमेरिकेंत एकंदरीनें बहु-संख्य लोकांना रोजगार असला तरी कांहीं भागांतून बेकारी अगर अर्धबेकारी अजूनाहि आढळून येते. अमेरिकेच्या दक्षिणे-कडील उपराज्यांत फार लोक गरीब असल्याचें आढळतें. त्याच-प्रमाणें, मंदीची झळ लागलेल्या देशाच्या इतर भागांतहि दारिद्र्य दिसून येतें. अहवाल १९४८ ते १९५४ ह्या कालापुरता आहे.

### अहमदाबाद-मुंबई रस्ता

पुढील वर्षीत अहमदाबादपासून मुंबईपर्यंत जाणारा ३६२ मैलांचा रस्ता तयार होऊन दोन्हीं शहरें जोडलीं जातील. राज्यांतील रस्त्यांच्या वाढीसाठी राज्य सरकारनें पहिल्या पंच-वार्षिक कार्यक्रमांत ११·६ कोटी रुपयांची तरतूद केली होती. तथापि, गेल्या पांच वर्षांत मुंबई सरकारनें ह्या बाबीवर २८ कोटी रुपये खर्च केले आहेत.

### शेतमालाच्या किंमतीचे चढउतार

शेतीच्या मालाच्या किंमतींत होणाऱ्या चढउताराची चवकशी करण्याचें काम सध्यां कृष्णप्पा कमिटीपुढें सोंपविण्यांत आलें आहे. कमिटीपुढें साक्ष देतांना इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्सचे डायरेक्टर, श्री. एस. के. अय्यंगार म्हणाले कीं शेतीच्या मालाच्या किंमती विवक्षित पातळीखाली जाऊं न देण्याचें सध्यांचें धोरण अव्यवहार्य आणि कृत्रिम स्वरूपाचें आहे. त्यामुळें शेतकऱ्यांना पगवलंबित्वाची संवय लागण्याचा संभव आहे. शेतीच्या मालाचा खर्च कमी करण्यांत आला पाहिजे. मग त्यासाठीं देशांतील नागरिकांना करांचा अधिक बोजा सहन करावा लागला तरी हरकत नाहीं. शेतकी मालाच्या किंमती घसरत असल्यामुळें संप व अस्वस्थता ह्या गोष्टींना आळा बसला पाहिजे. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उत्पादनवाढीकडे लक्ष देण्यांत आलेलें आहे; अर्थातच वाढत्या उत्पादनाबरोबर मालाच्या किंमतीहि खाली येणें क्रमप्राप्तच आहे. भारतानें आपल्यापुढें कल्याणकारी राज्याचें ध्येय ठेवलेलें आहे. अशा वेळीं शेतीच्या मालाच्या किंमती कृत्रिम रीत्या स्थिर करणें ह्या ध्येयाशीं सुसंगत होणार नाहीं. कारण, त्यामुळें बहुजन-समाजाचें राहणीचें मान उंचावण्याच्या मार्गांतच अडथळे निर्माण होतील. उलटपक्षीं लोखंड, खतें, यंत्रसामुग्री, गुरें, इत्यादि मालावर घेण्यांत येणारे कर रद्द करण्यांत आले पाहिजेत. शेतमालाच्या विक्री व्यवहारांत घेण्यांत येणारा भरमसाठ नफा कमी करण्यांत आला पाहिजे. त्यासाठीं सर्व देशभर आधुनिक पद्धतीचीं गुदामें बांधण्यांत आलीं पाहिजेत. म्हणजे, मूळ उत्पादकाला आपला माल त्यांतून सांठवितां येईल व दोन्ही किंमतींमधील तफावत हळुहळु कमी होऊं लागेल.

---

### बँकिंगच्या व्यवसायाला भरपूर वाव

मुंबई येथील देना बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. प्रवीणचंद्र गांधी ह्यांनीं बँकिंगच्या व्यवसायासंबंधीं आपले विचार एका प्रसंगीं व्यक्त केले. मुंबई उपनगरांतर्गत रोटरी क्लबपुढें बोलतांना ते म्हणाले कीं बँकिंगच्या व्यवसायाची वाढ करण्यास अद्याप बराच वाव आहे. पण व्यवसाय निरंतर टिकण्यासाठीं आणि देशहिताचा होण्यासाठीं तो मजबूत पायावर आधारला गेला पाहिजे. त्याचप्रमाणें, लोकांच्या विश्वासास पात्र झालेल्यांच्याकडूनच त्याचीं सूत्रें हलविलीं गेलीं पाहिजेत. बँकिंगच्या व्याख्या अगर वर्णनें पुष्कळ प्रकारांनीं करण्यांत येतात. तथापि बँका करीत असलेल्या कार्याबद्दल दुमत दिसत नाहीं. बँका बचतीला उत्तेजन देतात व ठेवींना आपल्याकडे आकृष्ट करतात. आपल्या जवळ आलेला पैसा उत्पादक कार्यांत गुंतवून बँकांना पंचवार्षिक कार्यक्रमांत महत्त्वाची कामगिरी बजावता येण्यासारखी आहे. भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी भांडवलाला महत्त्वाचें स्थान देण्यांत आलेलें आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेंतील ह्या भागाला जो पैसा लागेल तो व्यापारी बँकांकडून मिळूं शकेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. बँकांकडून हें कार्य पार पाडून घ्यावयाचें असेल तर त्यांना अधिक बळकटी प्राप्त करून दिली पाहिजे आणि त्यांची लोकप्रियता वाढविली पाहिजे. असें झालें तरच त्यांचें आर्थिक सामर्थ्य वाढूं शकेल. तथापि, बँकांनींहि आपल्या व्यवहारांत सुधारणा केली पाहिजे. त्यांनीं आपली वृत्ति अधिक व्यापक ठेवली पाहिजे, व्यवहार करण्याची परंपरागत व काटेकोर पद्धत बंद केली पाहिजे, आणि तें सर्व अधिक विधायक वृत्तीनें, मदतीच्या भावनेनें व परिस्थितीची सापेक्षता ध्यानांत बाळगून केलें गेलें पाहिजे. त्याचप्रमाणें, सरकार देशाचा विकास साधण्यासाठीं ज्या योजना आखीत आहे, त्यांच्याशीं आपले व्यवहार अधिक मिळते-जुळते ठेवण्याचें धोरणहि बँकांनीं स्वीकारलें पाहिजे.

---

### परदेशांत व्यवहार करणाऱ्या हिंदी बँका

| | |
|---|---|
| बँकांची संख्या | ३० |
| त्यांच्या कचेऱ्यांची संख्या | १०६ |
| कचेऱ्यांपैकी पाकिस्तानांत | ६९ |
| " मलायांत | ६६ |
| एकूण ठेवी | ६९ कोटी, ५४ लक्ष रु. |
| पैकीं पाकिस्तानांत | ३७ कोटी, २४ लक्ष रु. |
| पैकीं ब्रह्मदेशांत | १० कोटी, ६६ लक्ष रु. |
| कॅशचें ठेवींशीं प्रमाण | २४% |
| कर्जें | ३५ कोटी, ७७ लक्ष रु. |
| कर्जाचें ठेवींशीं प्रमाण | ५१·४% |
| ताळेबंदाची बेरीज | ८६ कोटी, ८९ लक्ष रु. |

---

### परदेशांतील हिंदी बँका व त्यांच्या कचेऱ्या

| बँका | कचेऱ्यांची संख्या | बँका | कचेऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| शेडयूल्ड | | | |
| १. अलाहाबाद | ३ | १७. पंजाब अँड सिंघ | १ |
| २. बँक ऑफ बरोडा | ३ | १८. पंजाब को-ऑप- | १ |
| ३. बँक ऑफ बरोडा | १० | १९. पंजाब नॅशनल | ३ |
| ४. कॅनरा | १ | २०. सदर्न | १ |
| ५. सेंट्रल | १४ | २१. ट्रेडर्स | १ |
| ६. हिंद | १ | २२. युनायटेड | १५ |
| ७. हिंदुस्थान कम. | १ | २३. यु. कमर्शिअल | ११ |
| ८. इंपीरिअल | ११ | २४. यु. इंडस्ट्रिअल | १ |
| ९. इंडिअन | ५ | | ९७ |
| १०. इं. ओव्हरसीज | ८ | बिगर-शेडयूल्ड | |
| ११. लक्ष्मी कमर्शिअल | १ | | |
| १२. मेट्रोपॉलिटन | १ | १. कमर्शिअल बँक | १ |
| १३. नॅशनल बँक ऑफ लाहोर | १ | २. फ्रॉंटियर बँक | १ |
| | | ३. महालक्ष्मी | ३ |
| १४. न्यू बँक | १ | ४. नॅशनल सिटी | १ |
| १५. ओरिएंटल | १ | ५. न्यू बंगाल | १ |
| १६. प्रभात | १ | ६. प्रवर्तक | २ |
| | | | ९ |

तमाम दंतरोगांवर
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## टेलिफोनविषयीं जागतिक आकडे

कोणत्याहि देशांतील टेलिफोनांची संख्या कित्येक गोष्टींवर अवलंबून असते. देशाची भौगोलिक परिस्थिति व लोकसंख्या ह्या बाबी महत्त्वाच्या असल्या, तरी औद्योगिक प्रगति ही बाब यापेक्षाहि अधिक महत्त्वाची आहे. कांहीं मोठाल्या देशांतून प्रचंड लोकवस्ती असूनहि तेथें कमी टेलिफोन आढळतात व कांहीं लहान देशांतूनहि त्यांची संख्या मोठी असते, त्याचें कारण हेंच आहे. प्रत्येक देशांतहि औद्योगिक विभागांतच व बंदरांच्या गांवीं टेलिफोनची संख्या मोठी असते. स्वित्झरलंड हा देश भरभराटींत असला, तरी तेथील उद्योगधंदे मोठाल्या शहरांत एकवटलेले नाहींत; लहान गांवांतून ते चालतात. त्यामुळें, टेलिफोनची गरज तेथें कमी भासते. युरोपच्या उत्तरेकडील देशांतील प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीवर मात करण्यास टेलिफोननीं उत्कृष्ट मदत केलेली आहे.

सबंध जगांत मिळून एकूण ८,९२,००,००० टेलिफोन आहेत. त्यांपैकी निम्म्यापेक्षा अधिक एकट्या अमेरिकेंत आहेत. प्रत्येक तीन माणसांच्या वांट्यास तेथें एक टेलिफोन येतो. सबंध जगाचे आकडे पाहिले, तर तें प्रमाण २८ माणसांना एक टेलिफोन, असें पडतें. अमेरिकेंत ३½ कोटी बिऱ्हाडांतून टेलिफोनची सोय आहे. न्यूयॉर्क, शिकॅगो व डेट्रॉइट ह्या तीन शहरांतीलच टेलिफोनची संख्या इतर कोणत्याहि देशांतील एकूण टेलिफोनच्या संख्येपेक्षा अधिक आहे.

– टेलिफोनच्या वापराच्या दृष्टीनें कॅनडाचा अनुक्रम पहिला लागतो. तेथें कॉलसची दरमाणशीं संख्या १९५३ मध्यें ४११ भरली. अमेरिकेंत ती ३८५, स्वीडनमध्यें ३०९, डेन्मार्कमध्यें २६२, ऑस्ट्रेलियांत १२२, स्पेनमध्यें ८१, ग्रेटब्रिटनमध्यें ७३ व फ्रान्समध्यें ४५ अशी होती. कॅनडांत ३५ लक्ष टेलिफोन आहेत व त्यांपैकी एक चतुर्थांश टेलिफोन मॉन्ट्रिअल व टॉरँटो ह्या शहरांत आहेत.

युरोपांतील कुठल्याहि देशापेक्षा ग्रेट ब्रिटनमध्यें दुप्पट टेलिफोन आहेत. प्रत्येक आठ माणसांस एक टेलिफोन, असें तेथें प्रमाण पडतें. टेलिफोनच्या दृष्टीनें महत्त्वाचीं शहरें लंडन, बर्मिंगहॅम, लिव्हरपूल, मँचेस्टर व ग्लासगो हीं होत.

युरोपांत सर्वांत अधिक टेलिफोन पश्चिम जर्मनींत, म्हणजे फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीमध्यें आहेत. १५ माणसांस एक टेलिफोन असें तेथें प्रमाण आहे. फ्रँकफुर्ट, हँबर्ग आणि म्युनिच ह्या शहरांतून प्रत्येकीं १,००,००० पेक्षा अधिक टेलिफोन चालू आहेत. पूर्व जर्मनी म्हणजे डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ जर्मनी संबंधीं आकडे उपलब्ध नाहींत.–

फ्रान्समध्यें २८ लक्ष टेलिफोन आहेत; युरोपीय देशांत फ्रान्सचा तिसरा अनुक्रम लागतो. पॅरिस, लिऑन व मार्से ह्या शहरांत टेलिफोनची गर्दी आहे.

स्वीडनमध्यें प्रत्येक १०० वस्तीस २८ टेलिफोन, असें प्रमाण पडतें. म्हणजे, टेलिफोनच्या प्रसाराच्या दृष्टीनें त्याचा अनुक्रम अमेरिकेच्या खालोखाल लागतो.

आफ्रिका खंडांतील एकूण टेलिफोनपैकीं निम्मे टेलिफोन एकट्या युनियन ऑफ साउथ आफ्रिकेंत आहेत. या खंडाच्या उत्तर किनाऱ्यावरील लहान देशांतून एक तृतीयांश टेलिफोन आहेत.

आशिया खंडांतील ३७ लक्ष टेलिफोनपैकी ७५ टक्के टेलिफोन एकट्या जपानमध्यें आहेत. जपानच्या खालोखाल चीन, भारत व टर्की ह्यांचा अनुक्रम लागतो. जपान व इस्राएल ह्या देशांत आशियामधील देशांच्या दृष्टीनें टेलिफोनचा प्रसार सर्वांत अधिक आहे; १०० लोकवस्तीस एक टेलिफोन, असें त्या देशांत प्रमाण पडतें.

ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड ह्या देशांत २०० लोकवस्तीस अनुक्रमें १६ व २२ टेलिफोन असें प्रमाण पडतें; म्हणजे टेलिफोनच्या प्रसाराच्या दृष्टीनें ते देश पुष्कळच पुढारलेले आहेत.

### टेलिफोनची संख्या : प्रादेशिक वांटणी

| प्रदेश | एकूण टेलिफोन संख्या | जागतिक संख्येशीं प्रमाण % | प्रत्येक १०० वस्तीशीं किती टेलिफोन |
|---|---|---|---|
| उत्तर अमेरिका | ५,४०,००,६०० | ६०·५ | ३०·६ |
| मध्य अमेरिका | ६,७०,००० | ०·८ | १·२ |
| दक्षिण अमेरिका | २२,४५,५०० | २·५ | १·९ |
| युरोप | २,५४,००,७०० | २८·५ | ४·३ |
| आफ्रिका | ११,८१,२०० | १·३ | ०·५ |
| आशिया | ३६,६२,२०० | ४·१ | ०·३ |
| ओशिआनिया | २०,३९,८०० | २·३ | १४·६ |
| जग | ८,९२,००,००० | १००·० | ३·६ |

### १०० लोकसंख्येस १५ पेक्षा अधिक टेलिफोन असें प्रमाण पडणारे प्रमुख देश

| | | | |
|---|---|---|---|
| १. युनायटेड स्टेट्स | ३१·२७ | ५. न्यूझीलंड | २१·८६ |
| २. स्वीडन | २७·७३ | ६. डेन्मार्क | १८·७३ |
| ३. कॅनडा | २४·०१ | ७. ऑस्ट्रेलिया | १६·०७ |
| ४. स्वित्झरलंड | २१·९० | ८. नॉर्वे | १५·७९ |

### १० लक्षापेक्षा अधिक टेलिफोन असलेले देश

| | |
|---|---|
| १. युनायटेड स्टेट्स | ५,०३,७२,९७२ |
| २. ग्रेट ब्रिटन | ६१,३९,२२९ |
| ३. कॅनडा | ३६,०३,९०० |
| ४. जर्मनी, फे. रिप. | ३२,५५,९७१ |
| ५. फ्रान्स | २७,६८,९५१ |
| ६. जपान | २५,९४,५०६ |
| ७. स्वीडन | १९,९४,३७८ |
| ८. इटली | १७,७४,४६२ |
| ९. ऑस्ट्रेलिया | १४,३२,७७६ |
| १०. स्वित्झरलंड | १०,७४,२१६ |
| ११. अर्जेंटिना | १०,०१,१५८ |

---

### बंगलोरमधील साबणाचा कारखाना

बंगलोर येथील सरकारी मालकीच्या साबणाच्या कारखान्याचें उत्पादन दुप्पटीपेक्षा अधिक वाढविण्यांत येणार आहे. कारखान्याचा विस्तार करण्याची ही दुसरी वेळ आहे. सध्यां ह्या कारखान्यांत दरसाल ७५० टन साबण तयार होतो. विस्ताराची नवी योजना अंमलांत आल्यावर ३,००० टन साबण तयार होऊं लागेल.

### मुंबई राज्यांतील बॉयलर्स

१९५४-५५ सालीं मुंबई राज्यांत ४७ नवे आणि ९ जुने बॉयलर नोंदविण्यांत आले. अशा रीतीनें सालअखेर राज्यांत नोंदविलेल्या बॉयलरांची संख्या ७,८०५ झाली. १९२४ सालीं इंडियन बॉयलर्स ॲक्ट अंमलांत आल्यापासून इतर राज्यांतील ५२८ बॉयलर मुंबई राज्यांत आणण्यांत आले; आणि त्यांपैकीं १४ हे अहवालाच्या सालीं आणण्यांत आले. तसेंच, या सालांत मुंबई राज्यांतून १८ बॉयलर इतर राज्यांत नेण्यांत आले. अशा रीतीनें, १९२४ सालापासून १,५२३ बॉयलर मुंबई राज्यांतून इतर राज्यांत नेण्यांत आले.

या सालीं मुंबई राज्यांत बॉयलरांमुळें ९ अपघात झाले. १९५४-५५ सालीं २,७०६ बॉयलरांची अंतर्बाह्य कसून तपासणी करण्यांत आली, आणि २,६५४ बॉलर वापरण्यायोग्य असल्याबद्दलचें सर्टिफिकेट देण्यांत आलें.

या सालीं बॉयलर अटेंडंटांच्या पात्रतेबद्दलच्या व प्रोफिशिअन्सी इन् इंजिनिअरिंगबद्दलच्या तीन परीक्षा घेण्यांत आल्या. कॉम्पीटन्सी सर्टिफिकेटपरीक्षेसाठीं ४५९ उमेदवार आणि प्रोफिशिअन्सी परीक्षेसाठीं ९६ उमेदवार बसले. त्यांपैकीं कॉम्पीटन्सी सर्टिफिकेटपरीक्षेंत २८१ आणि प्रोफिशिअन्सी परीक्षेंत ३९ उमेदवार उत्तीर्ण झाले.

---

### विम्याचें रीइन्शुअरन्स

हिंदी विमा कंपन्यांच्या सहकार्यानें एक रीइन्शुअरन्स कॉर्पोरेशन स्थापण्याचा भारत सरकारचा विचार आहे. प्रारंभ ३ कोटी रुपये भांडवलानें केला जाईल. त्यापैकीं २ कोटी रुपये भांडवल सरकार देईल व १ कोटी रुपये भांडवल विमा कंपन्या पुरवितील. सरकारच्या ह्या उपक्रमास विमा कंपन्यांचा हार्दिक पाठिंबा नाहीं; एकदां चंचुप्रवेश केला कीं, सरकार विम्याचा सर्वच व्यवसाय हळुहळु आपल्या ताब्यांत घेईल, अशी विमा कंपन्यांना भीति वाटते. वास्तविक, रीइन्शुअरन्सचें बहुतेक काम आज विदेशी कंपन्यांकडेच जात आहे व त्यामुळें भारताची बरीच परदेशी हुंडणावळ बुडत आहे. सरकारी रीइन्शुअरन्सच्या योजनेमुळें ही बूड वाचेल.

---

### ब्रह्मदेशाचें औद्योगीकरण

ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान श्री. ऊ नू ह्यांनीं आपल्या मॉस्कोच्या भेटींत असें जाहीर केलें आहे कीं, ब्रह्मदेशाच्या औद्योगीकरणाच्या कामांत ब्रह्मी सरकार राशिआकडून यंत्रसामुग्री घेणार आहे. त्याचप्रमाणें, सोव्हिएट तंत्रज्ञांचीहि मदत घेण्यांत येणार आहे. रंगून येथें बांधण्यांत यावयाच्या मोठ्या सभागृहाचा व खेळांच्या आखाड्याचा नकाशा सोव्हिएट शिल्पशास्त्रज्ञांकडून करवून घेण्यांत येणार आहे.

---

### पश्चिम पाकिस्तानचें अंदाजपत्रक

पश्चिम पाकिस्तानच्या संयुक्त राज्याच्या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत खर्चाच्या बाजूला ५०,६९,००,००० रुपयांची रकम दाखविण्यांत आली आहे. पश्चिम पाकिस्तानांतील निरनिराळीं राज्यें एकत्रित करण्यांत आल्यावर सर्वांचं मिळून नवें अंदाजपत्रक तयार करण्यांत आलें. अंदाजपत्रकांत १५ लाख रुपयांची शिल्लक दाखविण्यांत आली आहे.

सेवा, सचोटी आणि सौजन्याचें प्रतीक
स्थापना १९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेले भांडवल रु. ७,३६,०००
रिझर्व रु. ६,४६,०००
ठेवी रु. १,२७,०७,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
★ शाखा: दादर, माहीम, बेळगांव, पुणें ★
हमाम स्ट्रीट येथें बँकेची फोर्ट शाखा
२३ जूनपासून चालू झाली आहे.

### सुदानमध्यें कापडाच्या गिरण्या

सुदानमध्यें कापडाच्या गिरण्यांचा धंदा सुरू करण्याच्या कामीं भारतीय सरकार मदत करणार आहे. धंदा चालू करण्यासाठीं योग्य ती परिस्थिति आहे कीं नाहीं, तें पहाण्यासाठीं सरकारनें आपला प्रतिनिधि तेथें पाठविला होता. योग्य मजुरांचा पुरवठा, कच्चा माल, वहातूक, इत्यादि दृष्टीनें सदर प्रतिनिधीनें सुदानची पहाणी केली.

---

### न्यूझीलंडचा परदेशी व्यापार

३० सप्टेंबर, १९५५ रोजीं संपलेल्या वर्षांत न्यूझीलंडच्या परदेशी चलन लागणाऱ्या व्यवहारांत २,७२,००,००० पौंडांची तूट आली. गेल्या वर्षी ह्याच काळांत न्यूझीलंडकडे ४२,००,००० पौंड शिल्लक होते. खाजगी व्यापाऱ्यांनीं केलेल्या आयातींत वाढ झाल्यामुळें ही तूट मुख्यतः आली आहे.

---

### भारतीय चित्रपट चीनमध्यें लोकप्रिय

चीनमध्यें भारतीय चित्रपट-प्रदर्शनाचा उत्सव साजरा करण्यांत आला. भारतीय चित्रपट इतके लोकप्रिय झाले कीं नेहमींच्या रोजच्या ४ खेळांऐवजीं कांहीं सिनेमागृहांना रोज ८-९ खेळ दाखवावे लागले. निरनिराळ्या २० प्रमुख शहरांतील सिनेमागृहांतून सुमारें ३०,००,००० चिनी नागरिकांनीं भारतीय चित्रपट आवडीनें पाहिले.

---

### अणुशक्तीनें चालणाऱ्या पाणबुड्या

अमेरिकेच्या नाविक दलानें अणुशक्तीवर चालणाऱ्या आणखी ९ पाणबुड्या बांधण्याची तयारी चालविली आहे. अशी एक पाणबुडी बांधण्यासाठीं ४ ते ६ कोटी डॉलर्स खर्च येतो. साध्या पाणबुडीला येणाऱ्या खर्चापेक्षा हा खर्च दुप्पट आहे. पाणबुड्यांवर इतका खर्च केल्यास नाविक दलाच्या इतर बोटी आधुनिक पद्धतीच्या ठेवणें कठीण जाणार आहे.

पुण्याचें स्वागत लॉज
पुण्याच्या "स्वागत लॉज"चे पाहुणे, म्हणजे चांगल्या गोष्टींचे पुरस्कर्ते असल्याची १०० टक्के खात्री !
स्वागत लॉजिंग-बोर्डिंग, डेक्कन जिमखाना, फोन ४०६०

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

### सहकारी सप्ताह, १९५५

प्रतिवर्षाप्रमाणें चालू वर्षींहि पुणें सेंट्रल को. ऑप. बँक लि. मार्फत सहकारी सप्ताह शनिवार दि. ५-११-५५ ते शुक्रवार दि. ११-११-५५ अखेर मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

सप्ताहाचें उद्घाटन शनिवार दिनांक ५-११-५५ रोजीं पुणें जिल्हाधिकारी श्री. ए. यू. शेख यांचे अध्यक्षतेखालीं झालें.

अध्यक्षांनीं आपले भाषणांत सहकारी चळवळीबाबत मौलिक विचार व्यक्त केले. भारतांतील सध्यांचें दर माणशीं उत्पन्न पांच-पंचवार्षिक योजना अंमलांत आल्यानंतर फक्त दुप्पट वाढणार आहे. इतका मोठा प्रयत्न केल्यानंतर जी स्थिति येणार आहे, त्यासाठीं सर्वांनीं झटून जास्तींत जास्त त्यागाची तयारी ठेवली पाहिजे. देशांतील अर्थव्यवस्थेंत खाजगी उद्योगधंद्यांना आवश्यक तें स्थान राहीलच. तथापि, मूलभूत उद्योगधंदे समाजाच्या मालकीचे झाले पाहिजेत.

बँकेतर्फे जिल्ह्यांतहि खालीलप्रमाणें ठिकठिकाणीं सहकारी सप्ताह साजरा करण्यांत आला व त्यांत नवीन शिफारसीमुळें होणाऱ्या परिणामांची माहिती दिली. सरकारची भागीदारी, गोडाउन्सची व्यवस्था, यांमुळें शेती-अर्थव्यवस्थेचा पाया आतां सुदृढपणें घातला जाईल. त्याकरितां सर्वांनीं आवश्यक तें साहाय्य व सहकार्य देण्याची जरूरी आहे, हें सर्व ठिकाणीं सुलभ रीतीनें सांगण्यांत आलें.

रविवार दि. ६-११-५५ – भोर, शिकापूर व वरवंड.
सोमवार दि. ७-११-५५ – माळेगांव बुद्रुक व तळेगांव दाभाडें
मंगळवार दि. ८-११-५५ – डाळज, पौड व घोडेगांव.
बुधवार दि. ९-११-५५ – ओझर व खरपुडी.
गुरुवार दि. १०-११-५५ – सासवड.

सप्ताहाचा समारोप शुक्रवार दि.११-११-५५ रोजीं श्री. भा. म. ऊर्फ बापूसाहेब गुप्ते यांचे अध्यक्षतेखालीं करणेंत आला. श्री. बापूसाहेब गुप्ते यांनीं ग्रामीण पतपहाणीसमितीचे अहवालाकडे सर्वांचें लक्ष वेधलें व सहकारी चळवळ गेलीं ५० वर्षें चालू असली तरी ती अयशस्वी झाली असून खेड्यांचा आर्थिक विकास होण्यासाठी सहकारी चळवळ यशस्वी झालीच पाहिजे. द्वितीय पंचवार्षिक योजनेंत ग्रामोद्योग व तत्सम उद्योगधंदे यांसाठीं रु. २६० कोटीची तरतूद केलेली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा पुरेपूर मोबदला मिळाल्याशिवाय शेतीचे उत्पादनांत वाढ होणार नाहीं, तसेंच दलालांचेंहि नियंत्रण झालें पाहिजे असें सांगितलें.

### दि बेलापूर कं. लि.,

वरील कंपनीनें ३०-९-१९५४ अखेर संपलेल्या वर्षीं १,४१,६९,६४५ रु. ची साखरविक्री केली, व ४९,१९,३३४ रु. निव्वळ नफा मिळविला. त्यापूर्वीच्या वर्षी १,२७,६४,५९१ रु. ची विक्री होऊन ४३,७३,६३२ रु. नफा मिळाला होता. मॅनेजिंग एजंटसना ६,०९,६८९ रु. कमिशन मिळालें, डायरेक्टर बोर्डाला १२,७०० रु. फी देण्यांत आली व ऑडिटरांची फी २,५०० रु. झाली. भागदारांना प्रत्येक भागावर १६ रु. करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

## महाराष्ट्र रिजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें-१

### जुलै १९५५ मध्यें झालेल्या को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षेचा निकाल

पहिला वर्ग :— श्री. बी. आर. चौधरी, श्री. व्ही. जी. गोखले, श्री. एम. झेड. कलाल, श्री. बी. आर. वैद्य.

दुसरा वर्ग :— कु. सुधा अभ्यंकर, श्री. जे. आर. भट, श्री. एन. एन. चौधरी, श्री. ए. डी. देशमुख, श्री. एच. वाय. देशमुख, श्री. जी. के. देशपांडे, श्री. एस. व्ही. देशपांडे, श्री. पी. जी. गुलदगड, श्री. बी. जे. जगदाळे, श्री. एम. पी. जमदाडे, श्री. पी. वाय. जोशी, श्री. व्ही. आर. कदम, श्री. एम. बी. कुलकर्णी, श्री. पी. के. कुलकर्णी, श्री. आर. व्ही. कुलकर्णी, सौ. शैलजा कुलकर्णी, श्री. एस. एस. कुलकर्णी, श्री. व्ही. एम. क्षीरसागर, श्री. एस. एल. मगर, श्री. व्ही. के. महादेवकर, श्री. के. एन. न्हावी, श्री. ए. जी. पाटील, श्री. जी. एन. राजगुरु, श्री. टी. पी. शिंदे, श्री. एस. जी. वैद्य, श्री. बी. आर. वाणी, आणि श्री. एस. एल. वर्पे.

तिसरा वर्ग :—श्री. एम. डी. धर्माधिकारी, श्री. जे. जी. कोलते, श्री. टी. एस. मानकर, श्री. डी. टी. पाटील, श्री. पी. टी. पवार, श्री. ए. वाय. शाळीग्राम, श्री. एम. एस. ठोंबरे, श्री. एल. डी. दिवाण आणि श्री. ए. डी. ढोले.

मा. वि. मद्दाने,
सुपरिन्टेन्डेन्ट.

### डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा ७० वा वाढदिवस

डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि फर्ग्युसन कॉलेज या संस्थांचा ७० वा वाढदिवस-समारंभ डिसेंबर १९५५ मध्यें साजरा करण्याचें ठरलें आहे. समारंभाच्या निश्चित तारखा आणि कार्यक्रम योग्य वेळीं प्रसिद्ध करण्यांत येतीलच. गेल्या ७० वर्षांत सोसायटीच्या कार्याचा पुष्कळच विस्तार झाला आहे. सध्यां सोसायटीतर्फे चार कॉलेजें, सहा माध्यमिक शाळा, एक मॉडेल प्राथमिक शाळा, एक नर्सरी शाळा आणि एक टेक्निकल इन्स्टिट्यूट अशा संस्था चालविल्या जात आहेत. सोसायटीच्या या सर्व संस्थांमधून सुमारें बारा हजार विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणांत संस्थांच्या इमारतींत वाढ, कांहीं संस्थांना वसतिगृहांची जोड, प्रयोगशाळांचा विस्तार करणें, सोसायटीनें मुंबईस स्थापलेल्या "बॉम्बे कॉलेज" या संस्थेची इमारत पूर्ण करणें, इत्यादि अनेक जरूरीच्या गोष्टी नजीकच्या भविष्यकाळांत सोसायटीला करावयाच्या आहेत.

तेव्हां ७० व्या वाढदिवसनिधीला सर्वांनीं सढळ हातानें द्रव्यसाह्य करावें व आपली देणगी सेक्रेटरी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणें ४ यांच्या नांवें पाठवावी.

### साक्षरांसाठीं पुस्तकें

नव्यानें साक्षर झालेल्या लोकांना वाचण्यास योग्य अशा प्रकारच्या पुस्तकांची स्पर्धा भारतीय सरकारनें जाहीर केली आहे. पुस्तकें कोणत्याहि भारतीय भाषेंत लिहिलीं तरी चालतील. मात्र, तीं साध्या भाषेंत व आकर्षक पद्धतीनें लिहिलेलीं असावींत अशी अपेक्षा आहे. पुस्तकें पाठविण्याची मुदत ३० एप्रिल, १९५६ अखेर आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.